कल्याण वाहतूक विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८८ /२०२६ दि. 93 /०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात तसेच **१)** कल्याण वाहतूक उप विभाग **२)** कोळसेवाडी वाहतूक उप विभाग **३)** डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक १४/०४/२०२६ रोजी **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती'** निमित्त मोठया प्रमाणात मिरवणूका निघणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कल्याण फाटा **(मुंब्रा वाहतूक उप विभाग)** येथून कल्याणचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जड अवजड वाहनांना **कल्याणफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने कल्याण फाटा **(मुंब्रा वाहतूक उप विभाग)** येथून मुंब्रा बायपास रोड – खारेगांव – मुंबई नाशिक महामार्गाने पुढे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** कल्याण पश्चिम शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस चौक मार्गे कल्याण रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना तसेच खाजगी व सरकारी बसेस यांना **नेताजी सुभाषचंद्र बोस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	जड–अवजड तसेच खाजगी व सरकारी बसेसचे वाहन चालकांनी आपली वाहने हि नेताजी सुभाषचंद्र बोस चौक – म्हसकर हॉस्पीटल – कर्णिक रोड चौक – प्रेमऑटो सर्कल – बिर्ला कॉलेज – संदीप हॉटेल – खडकपाडा चौक – आधारवाडी चौक – वाडेघर चौक – दुर्गाडी जक्शंन पर्यंतच जड – अवजड तसेच खाजगी बसेस मार्गक्रम करतील. तसेच सरकारी बसेस हया दुर्गाडी जक्शंन मार्ग मार्गक्रम करुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** शहाड जकात नाका येथुन सुभाष चौक मार्गे कल्याण रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना तसेच खाजगी व सरकारी बसेस यांना **प्रेम ऑटो सर्कल चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	जड–अवजड तसेच खाजगी व सरकारी बसेसचे वाहन चालकांनी आपली वाहने हि प्रेमऑटो सर्कल चौक कडुन उजवे वळण घेवून – बिर्ला कॉलेज – संदीप हॉटेल – खडकपाडा चौक – आधारवाडी चौक – वाडेघर चौक – दुर्गाडी जक्शंन पर्यंतच जड – अवजड तसेच खाजगी बसेस मार्गक्रम करतील. तसेच सरकारी बसेस हया दुर्गाडी जक्शंन मार्ग मार्गक्रम करुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** रांजनोली बायपास **(कोनगाव वाहतुक उपविभाग)** येथुन कल्याण पश्चिम शहरातील दुर्गाडी चौक मार्गे कल्याण शहराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहने व जड – अवजड वाहनांना तसेच खाजगी व सरकारी बसेसना दुर्गाडी चौक येथे रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने डावे वळण घेवुन वाडेघर सर्कल, आधारवाडी मार्गे व उजवे वळण घेवुन गोविंदवाडी बायपास मार्गे दिनांक १४/०४/२०२६ रोजी रात्रौ २४:०० वा. नंतर इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**५)** दिपक हॉटेलकडुन महात्मा फुले चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दिपक हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने हि रेल्वे इन गेट – महालक्ष्मी हॉटेल समोरून – गुरूदेव हॉटेल हया मार्गे मार्गक्रम करुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**६)** पुष्पराज हॉटेल कडुन महात्मा फुले चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पुष्पराज हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने हि दिपक हॉटेल–रेल्वे इन गेट–महालक्ष्मी हॉटेल–गुरूदेव हॉटेल हया मार्गे मार्गक्रम करुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद –	७) सुभाष चौक कडुन महात्मा फुले चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तालबार** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने हि तालबार येथे उजवे वळण घेवुन तालबार मार्गे रामबाग लेन नं ० – कोटक महिंद्रा बॅंकमार्गे डावीकडे वळण घेवुन सहजानंद चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	८) बदलापुर अंबरनाथ रोड, नेवाळी नाका **(विठठ्लवाडी वाहतूक उपविभाग)** येथुन कोळसेवाडी पोलीस वाहतूक उपविभाग हददीत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना नेवाळीनाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने नेवाळी नाका येथुन बदलापुर अंबरनाथ रस्त्याने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	९) उल्हासनगर, शांतीनगर मार्गे सम्राट चौक येथून कल्याण पश्चिम व कल्याण पूर्व कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहने, खाजगी बसेस यांना **शांतीनगर, उल्हासनगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने दिनांक १४/०४/२०२६ रोजी रात्रौ २४:०० वा. नंतर इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	१०) नवीमुंबई कडून तळोजा बायपास मार्गेखोणी निसर्ग ढाबा कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना खोणी निसर्ग ढाबा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने खोणी निसर्ग ढाबा येथुन बदलापुर अंबरनाथ व काटई/बदलापुर चौक – लोढा पलावा – कल्याण फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना **दि. १४/०४/२०२६ रोजी १२:०० ते २४:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ–कल्याण व भिवंडी श.वा.शा.
प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.